# १. कार्यकारी संक्षेप

## १.१ पार्श्वभूमी

व्हीआयपीएल, रिलायन्स पॉवर लिमिटेड च्या संपूर्णपणे मालकीची असलेली एक विशेष उद्देश वाहन कंपनी, यांनी महाराष्ट्र राज्यातील नागपूर जवळ बुटी बोरी येथे ६०० एम डब्ल्यू (म्हणजेच २X३०० एम डब्ल्यू प्रत्येकी) थर्मल औष्णिक निर्मिती केंद्राची प्रस्थापना केलेली आहे. **व्हीआयपीएल** यांनी **अदानी इलेक्ट्रीसिटी मुंबई लिमिटेड- डीस्ट्रीब्युशन** (या पूर्वी रिलायंस इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड- डीस्ट्रीब्युशन या नावाने ज्ञात असलेली कंपनी) यांच्या बरोबर व्हीआयपीएल कडून त्यांच्या अनुज्ञप्ती क्षेत्रातील त्यांच्या ग्राहकांची उर्जेची गरज भागविण्यासाठी संपूर्ण ६०० मेगावॅट विजेची खरेदी करण्याकरीता पीपीए करारावर स्वाक्षरी केलेली आहे.

माननीय आयोगाने दिनांक ५ जानेवारी २०१५ च्या आदेशानुसार व्हीआयपीएल ला २५ वर्षांच्या मुदद्ती साठी सन २००६ मध्ये सुधारित केल्याप्रमाणे एमईआरसी (पारेषण अनुज्ञप्ती अटी) विनियमावली २००४ अनुसार पर्याय २ अंतर्गत आदेशाच्या तारखेपासून पारेषण अनुज्ञप्ती प्रदान केलेली आहे.

## १.२ सादरीकरण

पारेषण अनुज्ञप्ती धारकाने एमवायटी विनियमावली २०१९ चा विनियम ५.१ (बी) आणि विनियम ८ अनुसार दिनांक १ नोव्हेंबर २०२२ पर्यंत मिड-टर्म पुनर्विलोकन याचिका दाखल करण्याची आवश्यकता आहे. व्हीआयपीएल-टी यांनी आर्थिक वर्ष २०१९-२०, आर्थिक वर्ष २०२०-२१ आणि आर्थिक वर्ष २०२१-२२ चे सत्यापन करण्यासाठी, आर्थिक वर्ष २०२२-२३ चे तात्पुरते सत्यापन करण्यासाठी आणि एआरआर च्या सुधारित अंदाज पत्रकासाठी आणि आर्थिक वर्ष २०२३-२४ ते आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी टॅरीफ निर्धारित करण्यासाठी याचिका सादर केलेली आहे.

व्हीआयपीएल-टी डेटा गॅप्सला सादर केलेल्या प्रतिसादांच्या आधारे आणि माननीय आयोगाने दिलेल्या निदेशानुसार सुधारित याचिका सादर करीत आहे.

## १.३ आर्थिक वर्ष २०१९-२०, आर्थिक वर्ष २०२०-२१ आणि आर्थिक वर्ष २०२१-२२ चे सत्यापन करणे.

आर्थिक वर्ष २०१९-२०, आर्थिक वर्ष २०२०-२१ आणि आर्थिक वर्ष २०२१-२२ च्या एआरआर चा संक्षेप खालीलप्रमाणे सारणीबद्ध करण्यात येत आहे :

**सारणी: आर्थिक वर्ष २०१९-२० (रु. कोटी मध्ये) चे संक्षिप्त सत्यापन**.

| **अनु क्र.** | **तपशिल** | **एमवायटी आदेश** | **विनियमावलीनुसार हक्कदारी** | **नफा/ (तोटा) चा हिस्सा केल्यानंतर ची निव्वळ हक्कदारी** |
|---|---|---|---|---|
| १. | प्रवर्तन आणि देखभाल खर्च | ०.८४ | १.१४ | ०.९४ |
| २. | घसारा परिव्यय | १.२५ | १.२५ | १.२५ |
| ३. | दीर्घ मुदत कर्ज भांडवलावरील व्याज | १.२१ | १.२६ | १.२६ |
| ४. | खेळत्या भांडवलावरील आणि सुरक्षा अनामती वरील व्याज | ०.०९ | ०.०९ | ०.०९ |
| ५. | आयकर | ०.४४ | ०.११ | ०.११ |
| ६. | संभाव्य आरक्षणासाठी अंशदान | ०.०६ | ०.०७ | ०.०७ |
| **७.** | **एकूण महसुली खर्च** | **३.८८** | **३.९२** | **३.७१** |
| ८. | समन्याय भांडवलावरील प्राप्ती | १.१२ | १.१२ | १.१२ |
| **९.** | **एकूण महसुली आवश्यकता** | **५.००** | **५.०४** | **४.८३** |
| १०. | वजा: नॉन टॅरिफ उत्पन्न | ०.०१ | ०.०२ | ०.०२ |
| ११. | वजा: इतर व्यवसायातून उत्पन्न | ०.०० | ०.०० | ०.०० |
| **१२.** | **पारेषण टॅरिफमधून एकूण एकंदर महसुली आवश्यकता** | **४.९८** | **५.०१** | **४.८१** |
| १३. | खटला क्र. २६५ सन २०१८ मधील दिनांक १२ सप्टेंबर २०१८ रोजीच्या इनएसटीएस आदेशानुसार पारेषण टॅरिफ मधून महसूल | ४.६८ | ४.६८ | ४.६८ |
| १४. | अधिक: आर्थिक वर्ष २०१९-२० साठी उपलब्धता प्रोत्साहक | - | ०.०४ | ०.०४ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **१५.** | **महसुली गॅप/(वाढीव)(अनु क्र.१२+ अनु क्र.१४- अनु क्र.१३)** | | **०.३७** | **०.१७** |

**सारणी: आर्थिक वर्ष २०२०-२१ (रु. कोटी मध्ये) चे संक्षिप्त सत्यापन.**

| **अनु क्र.** | **तपशिल** | **एमवायटी आदेश** | **विनियामावली नुसार हक्कदारी** | **नफा/ (तोटा) चा हिस्सा केल्यानंतर ची निव्वळ हक्कदारी** |
|---|---|---|---|---|
| १. | प्रवर्तन आणि देखभाल खर्च | ०.४९ | ०.८६ | ०.६१ |
| २. | घसारा परिव्यय | १.२५ | १.२५ | १.२५ |
| ३. | दीर्घ मुदत कर्ज भांडवलावरील व्याज | १.०६ | १.१० | १.१० |
| ४. | खेळत्या भांडवलावरील आणि सुरक्षा अनामती वरील व्याज | ०.०८ | ०.०७ | ०.०७ |
| ५. | संभाव्य आरक्षणासाठी अंशदान | ०.०६ | ०.०७ | ०.०७ |
| **६.** | **एकूण महसुली खर्च** | **२.९३** | **३.३४** | **३.१०** |
| ७. | समन्याय भांडवलावरील प्राप्ती | १.२२ | १.३६ | १.३६ |
| **८.** | **एकूण महसुली आवश्यकता** | **४.१६** | **४.७०** | **४.४६** |
| ९. | वजा: नॉन टॅरिफ उत्पन्न | ०.०२ | ०.०२ | ०.०२ |
| १०. | वजा: इतर व्यवसायातून उत्पन्न | ०.०० | ०.०० | ०.०० |
| **११.** | **पारेषण टॅरिफ मधून एकंदर महसुली आवश्यकता** | **४.१४** | **४.६८** | **४.४३** |
| १२. | अधिक: एमवायटी आदेशामध्ये मंजूर केलेले पास्ट गॅप | ०.२६ | ०.२६ | ०.२६ |
| **१३.** | **पारेषण टॅरिफ मधून एकूण एकंदर महसुली आवश्यकता** | **४.४०** | **४.९४** | **४.६९** |
| १४. | खटला क्र. ३२७ सन २०१९ मधील दिनांक 30 मार्च २०२० रोजीच्या | ४.४० | ४.४४ | ४.४४ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | इनएसटीएस आदेशानुसार पारेषण टॅरिफ मधून महसूल | | | |
| **१५.** | **महसुली गॅप/(वाढीव)(अनु क्र.१३ - अनु क्र.१४)** | **-** | **०.५०** | **०.२५** |

**सारणी: आर्थिक वर्ष २०२१-२२ (रु. कोटी मध्ये) चे संक्षिप्त सत्यापन.**

| **अनु क्र.** | **तपशिल** | **एमवायटी आदेश** | **विनियमावलीनुसार हक्कदारी** | **नफा/ (तोटा) च्या हिश्शानंतरची निव्वळ हक्कदारी** |
|---|---|---|---|---|
| १. | प्रवर्तन आणि देखभाल खर्च | ०.५१ | १.०० | ०.६७ |
| २. | घसारा परिव्यय | १.२५ | १.२५ | १.२५ |
| ३. | दीर्घ मुदत कर्ज भांडवलावरील व्याज | ०.९१ | ०.९३ | ०.९३ |
| ४. | खेळत्या भांडवलावरील आणि सुरक्षा अनामती वरील व्याज | ०.०८ | ०.०७ | ०.०७ |
| ५. | संभाव्य आरक्षणासाठी अंशदान | ०.०६ | ०.०६ | ०.०६ |
| **६.** | **एकूण महसुली खर्च** | **२.८०** | **३.३१** | **२.९८** |
| ७. | समन्याय भांडवलावरील प्राप्ती | १.२२ | १.३६ | १.३६ |
| **८.** | **एकूण महसुली आवश्यकता** | **४.०२** | **४.६६** | **४.३४** |
| ९. | वजा: नॉन टॅरिफ उत्पन्न | ०.०२ | ०.०३ | ०.०३ |
| १०. | वजा: इतर व्यवसायातून उत्पन्न | ०.०० | ०.०० | ०.०० |
| **११.** | **पारेषण टॅरिफ मधून एकंदर महसुली आवश्यकता** | **४.०१** | **४.६३** | **४.३१** |
| १२. | अधिक: एमवायटी आदेशामध्ये मंजूर केलेले पास्ट गॅप | ०.२९ | ०.२९ | ०.२९ |
| **१३.** | **पारेषण टॅरिफ मधून एकूण एकंदर महसुली आवश्यकता** | **४.२९** | **४.९२** | **४.६०** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १४. | खटला क्र. ३२७ सन २०१९ मधील दिनांक 30 मार्च २०२० रोजीच्या इनएसटीएस आदेशानुसार पारेषण टॅरिफ मधून महसूल | ४.२९ | ४.२९ | ४.२९ |
| **१५.** | **महसुली गॅप/ (वाढीव) (अनु क्र.१३ - अनु क्र.१४)** | **-** | **०.६३** | **०.३१** |

## १.४ आर्थिक वर्ष २०२२-२३ साठी ए आर आर चे तात्पुरते सत्यापन

आर्थिक वर्ष २०२२-२३ साठी तात्पुरता महसुली गॅप/ वाढीव रक्कम खालील सारणी मध्ये संक्षिप्तपणे दिलेल्या आयएनअसटीएस आणि एआरआर मधून प्राप्त झालेल्या महसूलाची तुलना करून काढण्यात आलेली आहे

**सारणी: आर्थिक वर्ष २०२२-२३ (रु. कोटी मध्ये) साठी एआरआरचा संक्षेप**

| **अनु क्र.** | **तपशिल** | **एमवायटी आदेश** | **अंदाजित** |
|---|---|---|---|
| १. | प्रवर्तन आणि देखभाल खर्च | ०.५३ | ०.५३ |
| २. | घसारा परिव्यय | १.२५ | १.२५ |
| ३. | दीर्घ मुदत कर्ज भांडवलावरील व्याज | ०.७६ | ०.७७ |
| ४. | खेळत्या भांडवलावरील आणि सुरक्षा अनामती वरील व्याज | ०.०८ | ०.०८ |
| ५. | संभाव्य आरक्षणासाठी अंशदान | ०.०६ | ०.०६ |
| **६.** | **एकूण महसुली खर्च** | **२.६७** | **२.६८** |
| ७. | समन्याय भांडवलावरील प्राप्ती | १.२२ | १.२२ |
| **८.** | **एकूण महसुली आवश्यकता** | **३.८९** | **३.९१** |
| ९. | वजा: नॉन टॅरिफ उत्पन्न | ०.०२ | ०.०३ |
| १०. | वजा: इतर व्यवसायातून उत्पन्न | ०.०० | ०.०० |
| **११.** | **पारेषण टॅरिफ मधून एकंदर महसुली आवश्यकता** | **३.८७** | **३.८८** |
| १२. | अधिक: एमवायटी आदेशामध्ये मंजूर केलेले पास्ट गॅप | ०.२७ | ०.२७ |
| **१३.** | **पारेषण टॅरिफ मधून एकूण एकंदर महसुली आवश्यकता** | **४.१३** | **४.१५** |

| | | | |
|---|---|---|---|
| १४. | खटला क्र. ३२७ सन २०१९ मधील दिनांक 30 मार्च २०२० रोजीच्या इनएसटीएस आदेशानुसार पारेषण टॅरिफ मधून महसूल | ४.१३ | ४.१३ |
| **१५.** | **महसुली गॅप/ (वाढीव) (अनु क्र.१३ - अनु क्र.१४)** | **-** | **०.०२** |

**१.५ संचयी महसुली गॅप/ (वाढीव)**

खालील सारणीमध्ये आर्थिक वर्ष २०१९-२०, आर्थिक वर्ष २०२०-२१ आणि आर्थिक वर्ष २०२१-२२ साठी कॅर्रिंग कॉस्ट/ होल्डिंग कॉस्ट यांची गणना करून आकडेवारी देण्यात आलेली आहे.

**सारणी: कॅर्रिंग कॉस्ट/ होल्डिंग कॉस्ट (रु. कोटी मध्ये)**

| **तपशील** | **आर्थिक वर्ष २०१९-२०** | **आर्थिक वर्ष २०२०-२१** | **आर्थिक वर्ष २०२१-२२** | **आर्थिक वर्ष २०२२-२३** | **आर्थिक वर्ष २०२३-२४** |
|---|---|---|---|---|---|
| प्रारंभिक गॅप/ (वाढीव) | - | ०.१३ | ०.३९ | ०.७० | ०.७० |
| वर्षा दरम्यानची भर | ०.१३ | ०.२५ | ०.३१ | - | - |
| वर्षा दरम्यानची वसुली | - | - | - | - | ०.७० |
| अखेरची गॅप/ (वाढीव) | ०.१३ | ०.३९ | ०.७० | ०.७० | - |
| सरासरी गॅप/ (वाढीव) | ०.०७ | ०.२६ | ०.५४ | ०.७० | ०.३५ |
| व्याजदर | ९.६६% | ८.५७% | ८.५०% | ९.४५% | ९.४५% |
| कॅर्रिंग कॉस्ट/ होल्डिंग कॉस्ट | ०.०१ | ०.०२ | ०.०५ | ०.०७ | ०.०३ |
| **आर्थिक वर्ष २०२३-२०२४ मधली वसुली साठी एकूण कॅर्रिंग कॉस्ट/ होल्डिंग कॉस्ट** | | | | | **०.१७** |

आर्थिक वर्ष २०२३-२४ चा मध्यापर्यंतचा संचयी महसुली गॅप/ (वाढीव) रक्कम खालील सारणी मध्ये दर्शविल्या प्रमाणे आहे.

**सारणी: संचयी महसुली गॅप/ (वाढीव) रक्कम (रु.कोटी मध्ये)**

| तपशील | मूल्य |
|---|---|
| आर्थिक वर्ष २०१९-२० चा महसुली गॅप/ (वाढीव) | ०.१७ |
| आर्थिक वर्ष २०२०-२१ चा महसुली गॅप/ (वाढीव) | ०.२५ |
| आर्थिक वर्ष २०२१-२२ चा महसुली गॅप/ (वाढीव) | ०.३१ |
| आर्थिक वर्ष २०२२-२३ चा तात्पुरता महसुली गॅप/ (वाढीव) | ०.०२ |
| आर्थिक वर्ष २०१९-२०, आर्थिक वर्ष २०२०-२१ आणि आर्थिक वर्ष २०२१-२२ चा महसुली गॅप वरील कॅरींग कॉस्ट | ०.१७ |
| **एकूण** | **०.९३** |

### १.६ आर्थिक वर्ष २०२३-२४ आणि आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी सुधारित एआरआर

आर्थिक वर्ष २०२२-२३ साठी चा सहयोगी कॅरींग (धारणा) खरच आणि तात्पुरते सत्यापन याच्या समावेश सह आर्थिक वर्ष २०१९-२०, आर्थिक वर्ष २०२०-२१ आणि आर्थिक वर्ष २०२१-२२ च्या सत्यापानाचे मोजमाप करून महसुली गॅप/ (वाढीव) आर्थिक वर्ष २०२३-२४ च्या स्वतंत्र महसुली आवश्यकते मध्ये मिळविण्यात आलेला आहे, त्यानुसार आर्थिक वर्ष २०२३-२४ आणि आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी व्हीआयपीएल-टी द्यारे प्रक्षेपित केलेला निव्वळ एआरआर खालील सारणी मध्ये प्रस्तुत करण्यात येत आहे.

**सारणी: आर्थिक वर्ष २०२३-२४ आणि आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी एआरआर (रु. कोटी मध्ये)**

| अनु क्र. | तपशील | आर्थिक वर्ष २०२३-२४ | | आर्थिक वर्ष २०२४-२५ | |
|---|---|---|---|---|---|
| | | एमवायटी आदेश | सुधारित प्रक्षेप | एमवायटी आदेश | सुधारित प्रक्षेप |
| १. | प्रवर्तन आणि देखभाल खर्च | ०.५५ | ०.५५ | ०.५७ | ०.५७ |
| २. | घसारा परिव्यय | १.२५ | १.२५ | १.२५ | १.२५ |
| ३. | दीर्घ मुदत कर्ज भांडवलावरील व्याज | ०.६० | ०.६२ | ०.४५ | ०.४७ |
| ४. | खेळत्या भांडवलावरील आणि सुरक्षा अनामती वरील व्याज | ०.०७ | ०.०९ | ०.०७ | ०.०७ |
| ५. | संभाव्य आरक्षणासाठी अंशदान | ०.०६ | ०.०६ | ०.०६ | ०.०६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **६.** | **एकूण महसुली खर्च** | **२.५३** | **२.५६** | **२.४०** | **२.४२** |
| ७. | समन्याय भांडवलावरील प्राप्ती | १.२२ | १.२२ | १.२२ | १.२२ |
| **८.** | **एकूण महसुली आवश्यकता** | **३.७६** | **३.७९** | **३.६३** | **३.६४** |
| ९. | वजा: नॉन टॅरिफ उत्पन्न | ०.०३ | ०.०४ | ०.०३ | ०.०४ |
| १०. | वजा: इतर व्यवसायातून उत्पन्न | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| **११.** | **पारेषण टॅरिफ मधून एकंदर महसुली आवश्यकता** | **३.७३** | **३.७५** | **३.६०** | **३.६०** |
| १२. | खटला क्र. ३०१ सन २०१९ मधील एमवायटी आदेशातील मान्यता प्राप्त पास्ट गॅप | ०.२५ | ०.२५ | ०.२३ | ०.२३ |
| **१३.** | **पारेषण टॅरिफ मधून एकूण एकंदर महसुली आवश्यकता** | **३.९८** | **४.००** | **३.८२** | **३.८३** |
| १४. | आर्थिक वर्ष २०१९-२० चा महसुली गॅप/ (वाढीव) | | ०.१७ | | |
| १५. | आर्थिक वर्ष २०२०-२१ चा महसुली गॅप/ (वाढीव) | | ०.२५ | | |
| १६. | आर्थिक वर्ष २०२१-२२ चा महसुली गॅप/ (वाढीव) | | ०.१३ | | |
| १७. | आर्थिक वर्ष २०२२-२३ चा तात्पुरता महसुली गॅप/ (वाढीव) | | ०.०२ | | |
| १८. | आर्थिक वर्ष २०१९-२०, आर्थिक वर्ष २०२०-२१ आणि आर्थिक वर्ष २०२१-२२ चा महसुली गॅप वरील कॅरिंग कॉस्ट | | ०.१७ | | |
| **१९.** | **पारेषण टॅरिफ मधून एकंदर महसुली आवश्यकता** | **३.९८** | **४.९३** | **३.८२** | **३.८३** |

**१.७ प्रार्थना**

वरील वस्तुस्थिती आणि परिस्थिती च्या दृष्टीने व्हीआयपीएल-टी माननीय आयोगाला प्रार्थना पूर्वक विनंती करीत आहेत की:

१. याचिका दाखल करावी.
२. आर्थिक वर्ष २०१९-२०, आर्थिक वर्ष २०२०-२१ आणि आर्थिक वर्ष २०२१-२२ च्या सत्यापानास मान्यता द्यावी.
३. आर्थिक वर्ष २०२२-२३ च्या तात्पुरत्या सत्यापनास मान्यता द्यावी.
४. यात या सोबत सादर केल्याप्रमाणे आर्थिक वर्ष २०२३-२४ आणि आर्थिक वर्ष २०२४-२५ च्या सुधारित केलेल्या प्रक्षेपित एआरआर ला मान्यता द्यावी.
५. इनएसटीएस आदेशाद्वारे यापुढे दिनांक १ एप्रिल २०२३ पासून एआरआर च्या वसुलीस परवानगी द्यावी.
६. या याचिके मध्ये आगामी तारखे नुसार भर/ फेरबदल/ सुधारणा/ बदल करण्यास परवानगी द्यावी.
७. या याचिके मध्ये असतील अश्या अनावधानाने झालेल्या चुका/ विसंगती/ वगळणे/ फरकातील पूर्णत्व इत्यादींचे क्षमापन करावे.
८. माननीय आयोगाला योग्य वाटतील त्याप्रमाणे अन्य अनुतोष, आदेश किवा निदेश देण्यास परवानगी द्यावी.

**उमेश कुंडले**

**उप महाव्यवस्थापक**

**विदर्भ इंडस्ट्रीज पॉवर लिमिटेड**

मुंबई

दिनांक १२ डिसेंबर, २०२२